संच : क

# ८ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**
**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**
**शैक्षणिक प्रगती चाचणी**
**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - आठवी**
**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ____ **शिक्षकाची स्वाक्षरी** ________ **एकूण गुण :** ५०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

भीमाशंकराच्या पिंडीखालून निघालेली भीमा भूगर्भातून वाहत बाहेर पडते. उंच खडकावरून खाली कोसळते. तिचा पांढराशुभ्र धबधबा खूप सुंदर दिसतो. त्याचा नाद मनाला साद घालतो. दोन्ही बाजूस हिरवीगर्द वनराई आहे. आकाशात कृष्णगरुड घिरट्या घालतो. झुडपात पतंगासारखी लांब शेपटी असलेला नर्तक दिसतो. बुलबुल, तांबट, सुतार, वनकपोत व पारवे या पाखरांचे दर्शन घडते. भीमाशंकर अभयारण्याच्या मुंबई पॉईंट या कड्यावरून सूर्यास्ताचे विलोभनीय दर्शन घडते. खाली मुरबाड व कल्याणचा परिसर दिसतो. वनस्पती पॉईंटच्या पुढे हनुमान तळे लागते. हा सारा परिसर वृक्षवल्लीने सजलेला आहे. तेथे हिरव्यागार पाण्याने भरलेली दगडी पायऱ्यांची बारव आहे. पुढे नागाच्या फणीसारखा दिसणारा नागफणी कडा आहे. तेथून दरीतल्या कोकणाचे सुंदर दृश्य दिसते. पोखरी गावच्या पुढचा घाट उतरला की, घोडनदीवरचे डिंबा धरण आहे. या परिसरातल्या रानात संध्याकाळी कोल्हे, तरस, रानउंदरांसाठी टपून बसलेली शृंगी घुबडेही दिसतात. कोंढवळ गावच्या परिसरात आदिवासींची भातखाचरे आहेत. हिवाळ्यात तेथे रानडुकरे दिसतात. विहीरीकाठच्या ओल्या मातीत प्राण्यांच्या पाऊलखुणा पाहायला मिळतात.

**प्रश्न २.** भीमाशंकरच्या अभयारण्यात कोणता पक्षी घिरट्या घालताना दिसतो?
योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) बुलबुल    ब) कृष्णगरुड    क) तांबट

**प्रश्न ३.** उताऱ्यात आलेल्या प्राण्यांची नावे लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

**प्रश्न ४.** 'मुंबई पॉईंट' या कड्यावरून काय काय पाहता येईल ते लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न ५ ते ७ साठी** : हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

शेतात, रानावनात, कष्टात आयुष्य गेलेल्या प्रतिभासंपन्न बहिणाबाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती सौंदर्याची पूजा बांधणारी होती. ती निसर्गकन्या असल्यामुळे निसर्गाच्या कुशीतला 'सुगरणीचा खोपा' तिला भावला. या खोप्याच्या सौंदर्याचं वर्णन करणं हा या गाण्याचा एक भाव आहे. पण याहून महत्त्वाची दुसरी गोष्ट म्हणजे माणसाला संदेश देण्याची हुशारी या गाण्यात आहे. निसर्गाकडून माणसानं खूप गोष्टी शिकायला हव्यात. या गाण्यात सुगरणीचं कौतुक करता करता माणसाच्या कर्तृत्वाला बहिणाई आवाहन करते. सुगरणीचा खोपा म्हणजे सौंदर्य सृष्टीचं प्रतीक.खोपा म्हणजे झुलता बंगला. हा खोपा झाडाला उलटा टांगलेला आहे. या झुलत्या बंगल्यात तिचा जीव, म्हणजे तिची पिलं आहेत. तिचा सारा जीव त्या पिलांमध्ये आहे. तिचा श्रेष्ठ मातृभाव बहिणाबाईला कौतुकास्पद वाटतो. देवानं या सुगरण पक्षिणीला किती छोटासा जीव दिला आहे. माणसाचा जीव व सामर्थ्य सुगरणीपेक्षा कितीतरी विशाल आहे. पण तो ते सामर्थ्य सत्कारणी लावत नाही. जे जन्मानं देवाकडून मिळालं आहे त्यात समाधान, आनंद मानण्यापेक्षा, जे नाही त्याबद्दल तक्रारी करण्यात तो आयुष्य वाया घालवितो. आळस, कंटाळा व निष्क्रियता या शत्रूंना पांघरून तो आरामात वेळ घालवितो. सामर्थ्याचा योग्य उपयोग माणूस करून घेत नाही. आपली जन्मजात शक्ती वापरत नाही. याचं बहिणाईला दु:ख होतं. आपल्या इवल्याशा सामर्थ्याचा योग्य उपयोग करणाऱ्या सुगरणीकडून माणसानं स्वावलंबन शिकावं असं तिला वाटतं.

**प्रश्न ५.** निसर्गकन्या कोणाला म्हटले आहे? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सुगरण ब) माणूस क) बहिणाई

**प्रश्न ६.** 'सुगरणीचा खोपा' हे गाणे/कविता लिहिण्यामागे बहिणाईचा मुख्य उद्देश कोणता असावा? योग्य पयायाला गोल कर. (गुण २)

अ) सुगरणीला संदेश देणे.

ब) माणसाला संदेश देणे.

क) सुगरणीच्या पिलांचे वर्णन करणे.

**प्रश्न ७.** बहिणाईला कोणत्या गोष्टीचे दु:ख होते ते लिही. (गुण २)

__________________________________________

__________________________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G

**संच : क**

**प्रश्न ८ ते १० साठी :** ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

बिनभिंतीची उघडी शळा
लाखो इथले गुरू,
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू.

बघू बंगला या मुंग्यांचा,
सूर ऐकुया त्या भुंग्यांचा.
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू...

हिंडू ओढे, धुंडू ओहळ,
झाडावरचे काढू मोहळ.
चिडत्या, डसत्या मधमाश्यांशी
जरा सामना करू...

**प्रश्न ८.** फुलाफुलांचे रंग दाखवित कोण फिरते ते लिही. (गुण १)

______________________________

**प्रश्न ९.** बिनभिंतीच्या शाळेत कोणकोणत्या सजीवांचा उल्लेख आला आहे ते लिही? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न १०.** झाडावरचे मोहळ काढले तर काय करावे लागेल असे कवी म्हणतो ते खालील पर्यायातून निवड व योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) पाखरांशी गोष्टी कराव्या लागतील.

ब) ओढे धुंडाळावे लागतील.

क) डसणाऱ्या मधमाश्यांचा सामना करावा लागेल.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न ११ ते १३ साठी** : हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

‘जीवनशैली’ या आपल्या ग्रंथात डॉक्टर प्रकृतीचे तीन प्रकार सांगतात. एक मानसिक प्रकृती, दुसरी शारिरीक प्रकृती आणि तिसरी त्याची सामाजिक प्रकृती. आजार आणि अपघात यांपासून शरीराचे रक्षण केल्यास शरीरप्रकृती उत्तम राहू शकते. तुमच्या मनाचे आरोग्य तुमच्या विचारसरणीवर अवलंबून असते. ‘‘माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजाच्या साक्षीने त्याचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व फुलत असते. समाज हे गुणवत्तेचे उद्यान आहे असे आपण म्हटले तरी समाजाच्या प्रकृतीशी खेळणारे काही शत्रू असतात. कुटुंब ही समाजाची छोटी आवृत्ती मानली आणि व्यक्तिमत्त्व हे मूल्य मानून प्रत्येकाने आपली वाटचाल सुरू ठेवली तर सामाजिक प्रकृती उत्तम राहू शकते,’’ असं डॉ. सरदेसाई सांगतात.

डॉक्टरांच्या सहजसुंदर व्याख्यानात विचारांची अक्षरश: उधळण होत असते. ‘‘जीवनशैली’’ संदर्भातल्या व्याख्यानात डॉक्टर सांगत. ‘‘स्वत:कडे जाणीवपूर्वक पाहणे म्हणजे ध्यान. ध्यानातून स्वत्वाचा परिचय झालेला माणूसच समाधानाच्या दिशेने वाटचाल करू शकतो. आचार, विचार आणि उच्चार यांच्या त्रिवेणी संगमातून सुसंस्कार साकारतो. जीवनसत्त्वं ही केवळ आहारातून मिळत नाहीत तर विचारातून, चांगल्या पुस्तकातून आणि छंदातूनही मिळतात. त्यामुळे चांगल्या गोष्टीत मन रमविणे प्रकृतीला हितकारक ठरते.’’

**प्रश्न ११.** समाजाची छोटी आवृत्ती कोणती मानली आहे? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) कुटुंब ब) व्यक्तिमत्त्व क) उद्यान

**प्रश्न १२.** सुसंस्कार हे कोणत्या त्रिवेणी संगमातून होतात असे डॉक्टर सांगतात? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न १३.** डॉक्टरांनी प्रकृतीचे कोणते तीन प्रकार सांगितले आहेत? शरीरप्रकृती उत्तम राहण्यासाठी काय केले पाहिजे? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न १४.** 'सूर्योदय' या शब्दाचा संधिविग्रह खालीलपैकी कोणता? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सूर्य + दय    ब) सूर्यो + दय    क) सूर्य + उदय

**प्रश्न १५.** पुढील शब्दाचा संधी कर. (गुण १)

महा + ऋषी = ____________________

**प्रश्न १६.** खालील वाक्यात अधोरेखित केलेल्या शब्दांऐवजी कंसात दिलेल्या पर्यायांमधून योग्य वाक्प्रचार निवड आणि आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(आश्चर्याला पारावार नसणे, पारा चढणे, कळी खुलणे)

वाऱ्याची मंद झुळूक आली आणि पतंग उंच उंच जाऊ लागताच मंगेशला आनंद झाला.

____________________

____________________

**प्रश्न १७.** खालील शब्दांचा आकारविल्हे क्रम लाव. (वर्णानुक्रम लाव.) (गुण १)

पोपट, गरुड, कबुतर, पारवा

____________________

**प्रश्न १८.** खालील वाक्यातील चुकीचे विरामचिन्ह शोध, त्या जागी योग्य विरामचिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

केव्हातरी बाबांचे शब्द कानात भरले गेले, "काय वाटलं गं तुला समुद्र पार केल्यावर!"

____________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न १९.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सामान्यरूप ओळखून लिही. (गुण १)

राहुलने <u>दरवाजाला</u> रंग दिला.

________________________________________

**प्रश्न २०.** खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळख व त्या प्रकारचे क्रियाविशेषण अव्यय वापरून दुसरे वाक्य लिही. (गुण २)

राधा उद्या गावाला जाणार आहे.

क्रियाविशेषण : ________________________________________

वाक्य : ________________________________________

**प्रश्न २१.** अधोरेखित शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

बाबांनी माझ्या <u>वही</u> कव्हर घातले.

________________________________________

**प्रश्न २२.** खालील प्रसंग वाच व त्याला कंसातील म्हणींपैकी योग्य अर्थाची म्हण निवडून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(अंथरूण पाहून पाय पसरावे, शितावरून भाताची परीक्षा, घरोघरी मातीच्या चुली)

मेरी इयत्ता पाचवीमध्ये शिकत आहे. तिने १८ चा पाढा न अडखळता एका दमात म्हणून दाखवला. यावरून तिची गणिताविषयी आवड लक्षात येते. म्हणतात ना... ____________

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

**संच : क**

**प्रश्न २३.** तुझ्या शाळेत झालेल्या 'स्नेहसंमेलनाचा' अहवाल लिही. (गुण ५)



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २४.** खाली एक घटना दिली आहे. त्यावर तुझे मत व्यक्त कर. (गुण ५)

'गल्लीमध्ये एक कुत्र्याचे पिलू होते. गल्लीतील सर्वच मुलांना त्या गुबगुबीत आणि गोंडस पिलाचा खूप लळा लागला होता. सर्वजण त्याला आळीपाळीने खायला देत. त्याच्याशी खेळत. एक दिवस एक सरकारी गाडी आली. या पिलाच्या गळ्यात पट्टा नसल्याने त्याला पकडून नेण्यात आले....' या प्रसंगाबाबत तुझे मत काय आहे? ते लिही.



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न २५.** तुझ्या मित्राला शिष्यवृत्ती परीक्षेत चांगले गुण मिळाले. त्याचे अभिनंदन करण्यासाठी पत्र लिही. (गुण ५)

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 8th \Proof-II\19-06-17\G*